**ग्राममंडळ (ग्रामसभा), मेंढा(लेखा), ता.धानोरा, जि. गडचिरोली तर्फे प्रेस नोट: दि.१९.१२.२०२२**

प्रति, मा. ..........................................................

वर्तमान पत्र ........................................................................ यांस सप्रेम सेवा-जोहार!

खाली दिलेली बातमी आपल्या लोकप्रिय वर्तमान पत्रात प्रकाशित करून ९ वर्षापासून प्रलंबित महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम १९६४ ची अंमलबजावणी होवून दुर्गम, नक्षलग्रस्त भागातील आमच्या आदिवासी गावाला न्याय मिळवून घेण्याच्या कामात सहकार्य करावे हि विनंती.



आपला नम्र

**(डॉ. देवाजी तोफा) मो.9284100971**
अध्यक्ष, कार्यकारी मंडळ, ग्रामदानी गाव, मेंढा(लेखा),
ता.धानोरा, जि.गडचिरोली

---

**<u>प्रकाशित करण्यासाठी :</u>**

“दिल्ली मुंबईत आमचे सरकार, आमच्या गावात आम्हीच सरकार!” अशी घोषणा देवून त्याची अंमलबजावणी करणारे गाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या मेंढा(लेखा), ता. धानोरा, जि. गडचिरोली या गावाने २०१३ साली महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम १९६४ अंतर्गत सर्व अटींची आणि प्रक्रियांची पूर्तता करून ग्रामदानाचा स्वीकार केला अर्थात आपली व्यक्तीगत मालकी संपवून जमीन ग्रामसभेच्या नावे केली. ग्रामदानाचे प्रणेते आचार्य विनोबा भावे गेल्यावर ३५ वर्षाने सर्वसहमतीने असे क्रांतिकारक पाऊल उचलणारे मेंढा(लेखा) हे देशातील पहिले गाव आहे. ग्रामदान कायद्यानुसार ग्रामदान झालेले मेंढा(लेखा) गाव लेखा गट ग्राम पंचायातीतून वेगळे करून त्याला पंचायतीचे अधिकार देण्याची अधिसूचना शासनाने त्वरित काढणे आवश्यक होते. तसेच ग्रामदान घोषित झालेल्या गावाच्या ग्राममंडळ सदस्यांची जिल्हाधिकारी कार्यालयातील रजिस्टर मध्ये नोंद घेवून ती यादी ग्राममंडळाला देणे आणि जमीन नोंद मध्ये व्यक्तिगत नावे काढून टाकून तिथे ग्राममंडळ (ग्रामसभा) मेंढा(लेखा) अशी नोंद घेणे व जमिनीचे रेकॉर्ड ग्राममंडळाला सोपवणे हि कामे प्रशासनाने करावयाची होती. परंतु गेली ९ वर्षे सातत्याने सर्व पातळ्यावर पाठपुरावा करूनही शासन व प्रशासनाने हे काम तर केले नाहीच पत्राचे साधे उत्तरहि दिले नाही. शेवटी दुर्गम भागातील आदिवासी गावाला न्याय मिळविण्यासाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठवणे भाग पडले आहे.

उच्च न्यायालय मुंबई च्या नागपूर खंडपीठात **मा. न्यायमूर्ती श्री. ए.एस.चांदुरकर व मा. न्यायमूर्ती श्री. अनिल एल. पानसरे** यांच्या पुढे दिनांक १४.१२.२०२२ रोजी रिट-पिटीशन क्र.७६३५(२०२२), **“ग्राममंडळ (ग्रामसभा), मेंढा(लेखा) विरुद्ध महाराष्ट्र शासन व ईतर”** या केसची सुनावणी झाली. रिट-पिटीशन दाखल करून घेवून प्रतिवादी महाराष्ट्र शासनाचे १) मा. सचिव, महसूल व वने, २) मा. सचिव, ग्रामविकास व पंचायत राज, ३) मा. आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर व ४) मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना कोर्टाने नोटीस बजावली असून ४ आठवड्यात उत्तर देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ग्राममंडळ (ग्रामसभा), मेंढा (लेखा) करिता ॲड. श्री.ए.एम.सुदामे काम पाहत असून महाराष्ट्र शासनाकरिता ॲड.श्रीमती एन.पी. मेहता या कार्यरत आहेत. ९ वर्षानंतर तरी दुर्गम, नक्षलग्रस्त भागातील आदिवासी गावाला न्याय मिळेल का?